# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/08/2022 (रविवार)

---

## चोरी

**१) पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील मौदा ते रामटेक रोड एन.टी.पी.सी मौदा येथे दिनांक १२/०८/२२ चे २२.४५ वा. ते २३.२० वा. सुमारास फिर्यादी नामे— संजय गोपाल कोही (हेड कॉन्स्टेबन सी.आय.एस.एफ एन.टी.पी.सी मौदा) वय ३९ वर्ष, रा. एन.टी.पी.सी मौदा यांना फोन दवारे गुप्त माहिती मिळाली कि, एन.टी.पी.सी एरीया मध्ये कुंभारी गावाकडून एन.टी.पी.सी ची भिंत ओलाडून एक ईसम काहीतरी चोरी करण्याकरीता जाणार आहे. अशा मिळालेल्या माहितीवरुन फिर्यादी हे स्टॉप सह सदर एरीया मध्ये अम्बूस लावून बसले असता काही वेळाने २३.२० वा दरम्यान आरोपी नामे— शरद दिवाळू ठोसरे, वय २३ वर्ष, रा. मारोडी ता. मौदा हा कुंभारी गावाकडुन एन.टी.पी.सी ची भिंत ओलांडून आत शिरला. सदर आरोपी हा एन.टी.पी.सी एरीयामध्ये लोखंडी साहीत्या जवळ जातांना दिसला व तेथली लोखंडी सळाखी उचलतांनी दिसून आल्याने स्टॉप च्या मदतीने आरोपीला ताब्यात घेण्यात आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ५११ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री सोनेकर मोक्र ८९७५९२१७७० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ११ कि. मी. अंतरावरील तांदुळवानी शिवार येथे दिनांक दि. २८/०७/२२ चे १४.०० वा. ते दि. ११/०७/२२ चे १३.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— मोनिसरजा अब्दुल वहीत शेख, वय २६ वर्ष रा. सावरगाव रोड पावर हाऊस काटोल हे महावितरण कंपनीत कनिष्ठ अभियंता पदावर नौकरी करीत असुन त्यांचेकडे तांदुळवानी मुर्ती, वलनी येथील विदयुत पुरवठा देखभाल व इतर संबंधी कामे आहे. दि. ११/०८/२२ रोजी १५.३० वा. दरम्यान गावातील गाई, ढोरे चाणाऱ्या लोकांनी तांदुळवानी येथील लाईनमेन सौ सुषमा पाटील हिला सांगितले की, 'तांदुळवानी शिवारातील सिमेन्टचा पोल पडला असुन पोलला लावलेली ॲल्युमिनीयम तार दिसुन येत नाही' या माहितीवरून फिर्यादीने जावुन पाहले असता तेथील सिमेन्टचा पोल पडलेला दिसला व त्याला लागलेला इतर पोलांना लागलेला ९०० मिटर ॲल्युमिनीयम तार किंमती २७,३२४/—रु. चा अज्ञात आरोपीने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास परी पोउपनी बोळगिर मो.क्र. ९७६५७७१९७७ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील मौजा गहुहिवरा शिवार प्रतिक संगितराय यांचे शेतात कन्हान येथे दिनांक दि. १२/०८/२२ चे वा १९.१५ वा. ते १३/०८/२२ चे ०७.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— प्रतिक संगितराय वय ३४ वर्ष व २१ इंद्रप्रस्थ ले आउट स्वावलंबी नगर, नागपुर यांचे मौजा गहुहिवरा कन्हान शिवारात २.३२ एकर शेत आहे. सदर ठिकाणी त्यांनी व्यवसाय करीता लोखंडी गोडाउन बांधकामासाठी २ महिण्याअगोदर २२ टन लोखंडी साहित्य अंदाज किमत १२ लाख रु असे विकत घेतले होते. साहित्याचे देखरेख करीता दिवसा सुरक्षा गार्ड ची नेमणुक केली आहे. गार्ड सकाळी ०७.०० ते सायकाळी ०७.०० वा. पर्यत हजर राहतो. तसेच सामान बघण्याकरीता सदर ठिकाणी फिर्यादी हे स्वत: येत जात असता. दि १२/०८/२०२२ रोजी फिर्यादी यांनी शेतात जावुन सामान चेक केले व दुपारी ०१.३० वा. दरम्यान घरी निघुन गेले. दि. १३/०८/२२ ला सकाळी ०९.३० वा. दरम्यान फिर्यादीचे शेतातील सुरक्षा गार्ड नामे— विजय चौधरी रा. खंडाळा याने फिर्यादीला फोनव्दारे सांगितले की, शेतातील बांधकामासाठी असलेले काही लोखंडी साहित्य कोणीतरी चोरुन नेले आहे. असे सांगितलेवरुन फिर्यादीने सदर ठिकाणी पोहचले व साहित्याची पाहणी केली असता अंदाजे लोखंडी ३ टन परलीन कि. १,५०,०००/—रु., कनेक्टर २ टन कि. १,००,०००/—रु., २ टन पाईप कि. १,००,०००/—रु., टायरॉड ५०० kg कि. ५०,०००/—रु. तसेच इतर लोखंडी ५०० kg कि. ५०,०००/—रु. असे एकुण कि. ४,५०,०००/—रु. चा लोखंडी गोडाउन बांधकामासाठी लागणारा माल दिसुन आला नाही. शेतातील लोखंडी गोडाउन बांधकामाचे साहित्य अज्ञात आरोपीने चोरुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनी श्री सतिश मेश्राम मो.नं. ९०६७१७६६९४ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत गांगापूर शिवार हायवे रोडवर आमनदीच्या पुला जवळ येथे दिनांक १२/०८/२२ चे १३.०० वा. ते १३.३० वा. सुमारास प्रविण दुधनकर हे रक्षाबंधनाचा कार्यक्रम करिता सोबत बहीन अश्विनी दुधनकर व भाचा यश भांदककर वय १७ वर्ष यांचेसह त्यांच्या पलसर क्र एमएच— ३१/व्हीएस— १५४० या मोटरसायकलने तिऱ्री पवनी अडयाळ या गावी टिबल सिट जात होते. त्यादरम्यान उमरेड बस चा ओवर ब्रिज पार केला असता अचानक रोडवर उभा असलेला कोळशाचा भरलेला ट्रक क्र एमएच— ३४/बीजी— ९९७२ ला मागुन साईडने जोरदार धडक दिली. त्यामध्ये प्रविण दुधनकर वय ३५ वर्ष, रा. कवठा ता. समुद्रपुर वर्धा, ह.मु. नागपूर यांना दाढी जवळ मार लागुन त्यांचे रक्त निघाले व त्यांचा जागीच मृत्यु झाला. तर बहीन व भाचा याचें डोक्याला मार लागल्याने त्यांना सरकारी दवाखान्यात नेले असता तेथून मेडीकल कॉलेज नागपुर येथे रेफर केल्याने मेडीकल कॉलेज नागपुर येथे उपचार घेत आहे. यातील ट्रक क्र एमएच— ३४/बीजी— ९९७२ चा चालक आरोपी नामे— मोहम्मद अमीन हुसेन वय २८ वर्ष रा बकचुम्मा ता चित्रा राज्य झारखंड ह मु घुग्गुस जि चंन्द्रपुर याने आपले ताब्यातील वाहन रोडवर कोणतेही फलक न लावता निष्काळजीपणणे रोडवर उभे करुन निघुन गेल्याने यातील मोटरसायकल क्र. एमएच— ३१/व्हीएस— १५४० चा चालक याचे मरणास कारणीभुत होवुन अश्विनी प्रविण दुधनकर वय २४ वर्ष व यश नारायन भांदककर यांना जखमी होन्यास करणीभुत ठरला.

सदर प्रकरणी पोलिस हवालदार गणेश गिडकर, पो.स्टे. उमरेड यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २८३, ३३७, ३०४ अ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री दिनेश खोटेले मो.नं. ९४०४०८०६६६ हे करीत आहे.

# अकस्मात मृत्यू

**१) पो.स्टे. कळमेश्वर :–** अंतर्गत कळमेश्वर येथे दिनांक १३.०८.२०२२ चे ०७.५१ वा. सुमारास फिर्यादी नामे– घराजवळ शेजारी राहणारा जितु महाजन याने फिर्यादीस येवुन सांगीतले की, तुझी आई **अनुसया कैलास ठाकुर (मृतक), वय ४५ वर्ष, रा. उबाळी वार्ड क्र. २, कळमेश्वर** ही रोडवर पडली आहे. त्यानंतर लगेच त्या ठिकणी फिर्यादी ने जावुन पाहले असाता तीला आवाज दीला तीचा बाजुला संडास चा डबा पडला होता ती शोचास गेली असावी. त्यानंतर यातील मृतकास ग्रामीण रूग्णालय कळमेश्वर येथे नेण्यात आले तेथील डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. तीचा मरणास कोणालाही कोणताही संशय नाही तीला हृदय विकारचा झटका आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– कु. दिक्षा कैलास ठाकुर, वय १८ वर्ष, रा. उबाळी वार्ड क्र. २, कळमेश्वर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास जीपीएसआय पाठक मो.न. ९३७०१३८३८१ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. सावनेर:–** अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील गोविंदा सावजी बार समोर धापेवाडा येथे दिनांक १३/०८/२२ चे १६.०० वा. सुमारास स्वपनिल नामदेवराव वंजारी वय ३५ वर्षे रा. नागपुर ह. मु. नांदीखेडा, ह.मु. धापेवाडा ता. कळमेश्वर हा नेहमी दारू पित होता. यातील मृतक याने अती प्रमाणात दारू प्राशान केल्याने त्याची प्रकृती खराब होवुन गोविंदा सावजी बार समोर धापेवाडा समोर मयत झाला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सुरेश विठोबा वंजारी वय ५० वर्षे रा. नागपुर ह. मु. धापेवाडा ता. कळमेश्वर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सपोनि श्री सतिश पाटील मो.क्रं. ८८०५२५३९८२ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. सावनेर :–** अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील माताखेडी सावनेर येथे दिनांक १३/०८/२२ चे १८.४५ वा. सुमारास **वामन वासुदेव गांजरे (मृतक), वय ३२ वर्ष, रा. माताखेडी सावनेर ता. सावनेर** हा दारू पिण्याच्या सवईचा असुन नेहमी दारू पित होता. त्याने अती प्रमाणात दारू पिवुन आपले घरी झोपला असता त्याचे प्रकृती खाराब झाल्याने त्यास उपचाराकरीता ग्रामीण रूग्णालय सावनेर येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– धनराज वासुदेव गांजरे वय ४१ वर्षे रा. माताखेडी सावनेर ता. सावनेर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार यादव मो. क्र. ९४२३६०२९८७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**